आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२४ जुलै २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- अर्थसंकल्पाच्या निधी वाटपात भेदभाव केल्याच्या आरोपावरून विरोधकांची निदर्शनं/ अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आरोप फेटाळले

- महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात भरघोस तरतूद केल्याची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

- आयात शुल्क कमी केल्यानंतर सोनं आणि चांदीच्या दरांमध्ये घसरण सुरूच

- काठमांडूमध्ये खासगी विमानाला झालेल्या अपघातात १८ ठार

**आणि**

- ऑनलाइन गेम्ससाठीचं पहिलं ऑलिम्पिक सौदी अरेबियामध्ये होणार

**<><><><><>**

**केंद्रीय अर्थसंकल्पात** निधी वाटप करताना काही राज्यांसोबत भेदभाव केल्याचा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी फेटाळून लावला. विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांना काहीही दिलं नाही असा भ्रम काँग्रेस पसरवत असल्याचं सीतारामण यांनी राज्यसभेत शून्य प्रहरातल्या चर्चेवेळी सांगितलं. अर्थसंकल्पाच्या भाषणावेळी प्रत्येक राज्याचं नाव घेणं शक्य नसतं. नाव घेतलं नाही म्हणजे त्या राज्यांना काहीच दिलं नाही असं नाही, असं सीतारामण यांनी स्पष्ट केलं. लेखानुदान आणि कालच्या अर्थसंकल्पादरम्यान महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधल्या अनेक विकास प्रकल्पांना मंजुरी दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**तत्पूर्वी केंद्रीय** अर्थसंकल्पात निधी वाटपात भेदभाव करण्यात आल्याचा आरोप करत इंडिया आघाडीने आज संसद भवनाच्या आवारात निदर्शने केली. सर्व

राज्यांना समान न्याय द्यायला हवा अशी मागणी विरोधी पक्षांनी केली. केंद्रीय अर्थसंकल्पात निधीचं वाटप करताना विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांवर अन्याय झाल्याची टीका काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यसभेत केली. अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आली नाही तर राज्यांचा विकास कसा होईल, असा प्रश्न खरगे यांनी उपस्थित केला. मंत्र्यांनी विरोधी पक्षाच्या आक्षेपांना उत्तर दिल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला. या प्रश्नावर आपण संसदेच्या बाहेर आणि आतही आंदोलन करणार असल्याचं खरगे यांनी स्पष्ट केलं.

**लोकसभेतही विरोधी** पक्षांनी याच मुद्द्यावरून सभात्याग केला. लोकसभेचं कामकाज सुरू होताच इंडिया आघाडीच्या सदस्यांनी निदर्शने केली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षांच्या सदस्यांच्या या कृतीला आक्षेप घेतला. तसंच विरोधी पक्षांची ही कृती योग्य नसल्याचं ते म्हणाले. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजु यांनीही विरोधी पक्षांवर टीका केली. संसदेचं कामकाज सुरळीत चालावं यावर विरोधी पक्षांनी सर्वपक्षीय बैठकीत सहमती दर्शवली होती, त्यामुळे त्यांची ही कृती योग्य नसल्याचं रिजिजु म्हणाले.

**<><><><><>**

यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी भरघोस तरतूद केली असून राज्यातल्या अनेक रेल्वे प्रकल्पांची कामं हाती घेतल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी दरवर्षी सरासरी १ हजार १७१ कोटी रुपयांची तरतूद होत होती. गेल्यावर्षी ही तरतूद साडे १३ हजार कोटींहून अधिक होती, असं ते म्हणाले. युपीएच्या काळात सरासरी ५८ किलोमीटरचे रेल्वेमार्ग

बांधले गेले. गेल्या १० वर्षात हे प्रमाण सरासरी १८३ किलोमीटरपर्यंत वाढल्याची माहिती त्यांनी दिली. वडसा-गडचिरोली रेल्वे प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहित केली असून काम सुरू असल्याचं लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितलं.

<><><><><>

नीट आणि अर्थसंकल्पातल्या तरतुदींवरुन विरोधक जनतेची दिशाभूल करत असल्याची टीका भाजपा नेते रवी शंकर प्रसाद यांनी आज केली. नीट परीक्षेचे आयोजन योग्यरित्या झालं असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. परीक्षेच्या संदर्भातल्या अनियमितता लक्षात आल्यावर सरकारनं तत्काळ सीबीआय चौकशी सुरू केली होती,असंही त्यांनी सांगितलं. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जगात भारताची नकारात्मक प्रतिमा तयार केली आहे. अर्थसंकल्पात सर्व समाज घटकांसाठी तरतुदी केल्या आहेत. त्यामुळं विरोधीपक्षांनी अर्थसंकल्प नीट वाचून समजून घ्यावा, असा सल्ला त्यांनी दिला.

<><><><><>

कर्करोगावरची औषधं सहजरित्या उपलब्ध व्हावीत, यासाठी या औषधांच्या आयात शुल्कात सूट देण्याचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी काल केंद्रीय अर्थसंकल्प मांडताना ही घोषणा केली. यात स्तनांच्या कर्करोगासाठी, फुफ्फुसाच्या कर्करोगासाठी आणि पित्तनलिकेच्या कर्करोगासाठी असलेल्या औषधांचा समावेश आहे. देशातल्या २७ लाख कर्करुग्णांना याचा लाभ मिळणार असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सांगितलं आहे.

<><><><><>

सोनं आणि चांदीवरचं आयात शुल्क अर्थसंकल्पात कमी केल्यानंतर या धातूंच्या दरांमध्ये होणारी घसरण आजही सुरूच आहे. २४ कॅरेट सोनं कालपासून तोळ्यामागे सुमारे ३ हजार ४०० रुपये आणि २२ कॅरेट सोनं तोळ्यामागे ३ हजार ३०० रुपयांनी स्वस्त झालं आहे. सध्या २४ कॅरेट सोन्याचे दर ६९ हजार रुपयांच्या पलीकडे आणि २२ कॅरेट सोन्याचे दर ६७ हजार ५०० रुपयांच्या पलीकडे आहेत. चांदी कालपासून सुमारे २ हजार ६०० रुपयांनी स्वस्त झाली आहे. सध्या चांदीचा दर किलोमागे सुमारे ८५ हजार रुपये आहे.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आपलं उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. जालनाच्या आंतरवाली सराटी इथं गेल्या पाच दिवसांपासून त्यांचं आमरण उपोषण सुरू आहे. सरकारचा जीव ज्या खुर्चीत अडकला आहे, ती खुर्ची मिळवण्याच्या तयारीला आम्ही लागणार आहोत, असं जरांगे यांनी वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालय २९ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान विशेष लोक अदालतीचं आयोजन करणार आहे. त्यात प्रलंबित खटले मार्गी लावणं, सामंजस्यानं तोडगा काढणं याला प्राधान्य दिलं जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या उपक्रमाचं आयोजन होतंय. सर्वोच्च न्यायालयात खटले प्रलंबित असणाऱ्या याचिकाकर्त्यांनी याचा लाभ घ्यावा असं आवाहन, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी केलं आहे.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजाच्या वेळेत सुधारणा केली आहे. नव्या सुधारणेनुसार न्यायालयाचं कामकाज आता सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत चालेल. सार्वजनिक सुट्टी आणि महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी न्यायालयाचं कामकाज बंद राहील. १ ऑगस्टपासून नवे नियम लागू केले जाणार आहेत.

**<><><><><>**

नेपाळमधल्या काठमांडू इथल्या विमानतळावर आज सकाळी एका खासगी विमान कंपनीच्या विमानाचा अपघात झाला. यात १८ जणांचा मृत्यू झाला असून वैमानिकासह तीन प्रवाशांना वाचवण्यात यश आलं आहे, अशी माहिती काठमांडूच्या वरिष्ठ पोलीस अधिक्षकांनी दिली. अपघाताची माहिती मिळताच नेपाळचे गृहमंत्री रमेश लेहकाक यांनी घटनास्थळावर जाऊन पाहणी केली.

**<><><><><>**

ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री डेव्हिड लॅमी यांचं आज भारतात आगमन झालं. मंत्रिपदाची सूत्रं हातात घेतल्यानंतरचा त्यांचा हा पहिलाच औपचारिक दौरा आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी लॅमी यांचं स्वागत केलं. या दौऱ्यामुळे भारत आणि ब्रिटन यांच्यातली सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट होईल, असा विश्वास जयस्वाल यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेच्या संचालकपदी रोनाल्ड एल. रोवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते यापूर्वी अमेरिकी गुप्तचर यंत्रणेच्या उपसंचालकपदावर कार्यरत होते. अमेरिकेचे माजी अध्यक्ष आणि अध्यक्षपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प

यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी सुरक्षाव्यवस्थेत त्रुटी आढळून आल्यानंतर अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेच्या प्रमुख किंबर्ली चीटल यांनी पदाचा राजीनामा दिल्याने रोवे यांच्याकडे हे पद सोपवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महिलांच्या आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं अ गटातल्या अंतिम सामन्यात नेपाळवर ८२ धावांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. भारतानं प्रथम फलंदाजी करत १७८ धावा केल्या होत्या. त्याचा पाठलाग करताना नेपाळला २० षटकांत अवघ्या ९६ धावा करता आल्या. भारताची सलामीवीर शेफाली वर्मा हिनं ४८ चेंडूत ८१ धावा केल्या. दयालन हेमलता हिनं शेफालीसह १२२ धावांची भागीदारी केली. गोलंदाजीत भारताकडून दीप्ती शर्मा हिनं तीन तर राधा यादव आणि अरुंधती रेड्डी यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. शेफाली वर्मा हिला सामनावीर घोषित करण्यात आलं.

या स्पर्धेत आज श्रीलंकेच्या दंबुला मैदानावर ब गटातल्या बांगलादेशचा सामना मलेशियाशी होणार आहे.  दुपारी दोन वाजता हा सामना सुरू होईल. तर संध्याकाळी सात वाजता यजमान श्रीलंकेचा सामना थायलंड संघाशी होणार आहे.

**<><><><><>**

पुढच्या वर्षी ई-स्पोर्ट्स अर्थात ऑनलाइन गेम्ससाठीचं पहिलं ऑलिम्पिक सौदी अरेबियामध्ये होणार आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या १४२ व्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब झालं. यामुळं डिजिटल क्रांतीसोबत ऑलिम्पिक जोडलेलं राहिल, अशी प्रतिक्रिया समितीचे अध्यक्ष थॉमस बाच यांनी दिली आहे.

ई-स्पोर्ट्स आयोग आणि सौदी अरेबियाची राष्ट्रीय ऑलिम्पिक समिती या खेळांचं आयोजन करणार आहे. स्पर्धेचं शहर, ठिकाण, खेळ आणि खेळाडूंच्या

पात्रतेचे निकष लवकरच ठरवले जाणार आहेत. गेल्या २ वर्षात सौदी अरेबियानं ऑनलाइन गेम्सच्या अनेक स्पर्धांचं आयोजन केलं आहे. जगभरातले सव्वा २ कोटींहून अधिक नागरिक हे खेळ खेळतात.

**<><><><><>**

गुजरात, कोकण, गोवा आणि महाराष्ट्रात पुढचे दोन दिवस तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिजोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. येत्या दोन दिवसांत गंगा आणि सिंधू नदीच्या मैदानी प्रदेशात पाऊस वाढण्याचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**